नं. ५८७

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
चौरंग.

लेखक ब्राम्हण छापखाना
मुंबई.

सन
१८९२

संग्रहालय क्रमांक
~~५८~~
363

पुस्तकाचें नांव राजारामाचे चौरंग.

363

५८
(चरित्र)

सं. च. १२१ प. १२९

# …जारामाचें चरित्र.

…याचें ध…

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. नं. १२९



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

मुंबईंत

"ब्राह्मण" छापखान्यांत छापिलें.

भाद्रपद वद्य ११ शालिवाहन शके १८१४.

(इसवी सन १८९२.)

किमत दोन आणे, ट० हां० अर्धा आणा.

खालील पुस्तकें मुंबईत मराठा हायस्कूल मध्यें "ब्रा
छापखान्यांत विकत मिळतील.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| शिव छत्रपतीचें चरित्र | ० | ३ | ० |
| रत्नाकरपंतआप्पा, अहल्याबाई होळकरीण व सिधोजी निपाणकर. | ० | १ | ६ |
| शककालविचार. | ० | ६ | ० |
| एकनाथाचें चरित्र | ० | ३ | ० |
| संभाजीचें चरित्र | ० | १ | ६ |
| ( मोरोपंती ) कर्णपर्वांतील वेंचे. | ० | २ | |
| ( संस्कृत ) किरात सर्ग १ ला. | ० | १ | |

सं. च. ९२९

# राजारामाचें चरित्र

१–संभाजी पकडलागेल्यानंतरची आमच्या मंडळाची स्थिति. २–संताजी घोर-
ड्याचें धाडस. ३–धनाजी जाधवाचा पराक्रम. ४–रायगड पडतो. ५–त्या का-
ळच्या मऱ्हाठेशाहीचे चार मजबूत खांब. ६–राजाराम चंदीस पोंचेपर्यंतची हकीकत.
७–राजाराम गेल्यानंतरची पन्हाळा गडची स्थिति. ८–चंदीप्रांतीं पोंचल्यानंतरची
राजारामाचा क्रम. ९–संताजीनें केलेल्या आज्ञातिक्रमाचें फळ. १०–चंदीस वेढा
पडतो. ११–मऱ्हाठे वेढा उठविण्यास येतात. १२–कावेरीपाकची लढाई. १३–
संताजी चंदीचा वेढा उठवितो. १४–कासिमखानाचा पुरा मोड. १५–रामचंद्र-
पंताची संपन्नता. १६–संताजी व धनाजी. १७–चंदीच्या वेढ्यास दिल्लीपतीकडून
कुमक येते. १८–रामचंद्रपंताचें प्रसंगावधान व संताजीच्या भाईबंदांचें शहाणपण.
१९–रामचंद्रपंताची मसलत व राजारामाची चंदींतून सुटका. २०–राजारामाचा
शेवट.

---

## १–संभाजी पकडलागेल्यानंतरची आमच्या मंडळाची स्थिति.

राजाराम या वेळीं कोठें नजर कैदेंत होता, तें मुकरर कळत नाहीं.
...ण तो संभाजी ज्या प्रांतीं होता, त्याच प्रांतीं असावा, असा तर्क आहे.
...कबराच्या आगमनीं जशी रायगडीं खटपट चालली होती, ...
...णखींही एकदा पुढें चालली. या खटपटींत येसूबाईच्या माहेरची
...डळी बरीच होती. शाहूस गादी देऊन राजारामास कुल कारभार
...वा, असा या खटपट्यांचा विचार होता. ही खबर संभाजीस लागली,
...व्हां संभाजीनें शिर्क्यांचें सर्पसत्र आरंभिलें व राजारामास अगदीं आपणां-
...वळ नजर कैदेंत ठेविलें. या खटपटी नंतर राजारामास आपणांपासून
...भाजीनें फारसें दूर ठेविलेलें असण्याचा संभव नाहीं.

हंबीरराव नाहींत, छत्रपती पकडला गेला, रायगडास वेढा पडला, मु-
...द्दी कोणी नाहीं, असा विलक्षण प्रसंग आमच्या मंडळावर कोसळला.

---

## २–संताजी घोरपड्याचें धाडस.

अवरंगझेबाची छावणी बहादुर गडीं होती. बहादुरगडाचें देशी नांव तुळापुर असून, तें भीमाइंद्रायणीच्या संगमीं आहे.

बादशहास बराचें वचक पडून मंडळांत थोडी थावराथावर करण्यास सांपडावी, अशा हेतूनें संताजीनें एक धाडसाची युक्ति काढिली व ती रामचंद्रपंतानें पसंत केली. तुळापुर मुक्कामीं बादशाही छावणीवर एकदा छापा घालून बादशाही डेऱ्याचे दोन्ही कळस तनावे तोडून ध्यावयाचे व लगेच रायगडास वेढा देणाऱ्या लश्करांतून पांच हत्ती पकडून आणायाचे, असा आपला कृतसंकल्प संताजीनें रामचंद्रपंतास कळविला व त्यास रामचंद्रपंताची मंजुरी मिळाली.

धनाजी जाधवाच्या फौजेंतील दोन हजार शिपाई व विठोजी चव्हाण इतक्यांस बरोबर घेऊन, आपले बंधू बहिरजी व मालोजी यांसहवर्तमान संताजी निघाला तो पहिल्यानें "डोंगरांच्या आश्रयानें जेजुरीस" आला. तेथें "श्रीचें दर्शन करून दिव्याच्या घाटाखालीं जाऊन झाडींत मुक्काम केला. तेथून मध्यरात्रीचे अमलांत तुळापुरचे मुक्कामीं जावयास मार्गानें जातांना पलीकडे तीन कोसांवर छबिन्याचे स्वारांची गांठ पडली, त्यांस सांगितलें कीं पादशहाचे लश्करांतील हिंदु राजे शिर्के व मोहिते वगैरे आहेत, त्यांजकडील आह्मीं छबिन्यास गेलों होतों, मुत्रादल्यास आले ह्मणून लश्करांत मागें जातों. अशी पक्की खूण सांगितल्या वरून त्यांनींही मार्ग दिला. यांनीं लश्करांत शिरून छापा घातला, त्या काळीं लाखो फौज असतां, दोन तीन हजार स्वारांनिशीं छापा घालून, बहुत तसनस करून, पादशहाचे डेऱ्याचे तनावे तिघे बंधू घोरपडे व चव्हाण यांणीं तोडून डेऱ्याचे सोन्याचे कळस दोन्ही घेतले. यांजकडीलही स्वार थोडे बहुत पडले. पादशहाचे फौजेचा दुभाग करून गटानिशीं निघोन सिंहगडाचे झाडींत आले. सिंहगडावर प्रतापराव गुजर याचा लेक सिदोजी गुजर हे किल्लेवर होते. त्यांस हें वर्तमान कळल्यानंतर खालीं येऊन यांसीं भेटले, यांची बरदास्त केली. जखमी होते ते

त्याच्या स्वाधीन केले. ते किल्ल्यावर नेले. दोन मुक्काम त्या झाडींत करून, तेथोन निघोन भोरावर येऊन, पुनः घाटाखालीं उतरोन रायगडचें संधान राखून, झुल्फिकार याचे फौजेवर छापा घालून, त्याची तसनस करून, त्यांतील पांच हत्ती घेऊन, पारघांट चढून, वाई सातान्या वरून पन्हाळेस येऊन, महाराजांचें दर्शन घेऊन, पादशहाचे डेन्याचे कळस आणिलेले पुढें ठेविले. पांच हत्ती पुढें केले." या प्रसंगीं राजारामाकडून संताजीस, बहिरजीस, मालोजीस व विठोजीस "ममलकतमदार, हिंदुराव, अमीरुल्उमराव" व हिंमत बहादुर" असे चार किताब अनुक्रमें देण्यात आले. तेव्हां रामचंद्रपंतानें हंबीररावांच्या मरणापासून कुजत पडलेलें सेनापतीचें पद संताजीस मिळावें, अशी शिफारस केली. "जरी माझे मनांत धनाजी जाधव यांस हें पद द्यावें असें आहे, तरी तुमची मर्जी संताजीस तें द्यावें अशी आहे, तर तें मी त्यास देतों" असें म्हणून शालिवाहन शके १६१० विभव नाम संवत्सरे श्रावण शुद्ध पंचमी या दिवशीं राजारामानें सेनापतीचें पद संताजीस दिलें.

---

## ३–धनाजी जाधवाचा पराक्रम.

हा संताजीचा पराक्रम पाहून धनाजीचेही बाहू वीरश्रीनें स्फुरण पावूं लागले, व फळटणच्या मैदानांत शाहिस्ते व रणमस्त यांच्या ५ तोफा त्यानें पाडाव केल्या. वाटेंत मोगल तुटून पडले असतांही, त्यांस दाद न देतां त्या पांच तोफा सांभाळून धनाजीनें पन्हाळा मुक्कामीं आणिल्या. तेव्हां "जयसिंगराव" असा किताब राजारामानें धनाजीस दिला.

---

## ४–रायगड पडतो.

ही सर्व मऱ्हाठ्यांची हालचाल व खटपट पाहून दिल्लीपतीनें झुल्फिकारास कुमक पाठविली, व पन्हाळ्यास शह लाविण्याचा बेत केला. लोक-

संशय आल्यामुळें चौकीच्या लोकांनीं कोरडा उगारला व राखेचे तोबरे-ही दिले. " तरी आपण यात्रेकरू रामेश्वरास जातों " याच्या पलिकडे-स यांच्या तोंडांतून बाहेर पडलें नाहीं. दोन दिवस या मंडळीस कैदेंतही ठेवून पाहिलें. " कैदेंत असतां आपण अन्नास शिवत नाहीं अशा अर्थाचा उद्गार या मंडळीच्या तोंडून निघाला. तेव्हां अखेरीस " हे यात्रेकरूच खरे " असें चौकीदारानें ठरवून यांस सोडून दिलें.

अष्टप्रधानांवर " प्रतिनिधी " नांवाचें नवें पद निर्माण करून, तें शालिवाहन शके १६१४ या वर्षी प्रल्हादपंतांस त्यांच्या मसलतीबद्दल देण्यांत आलें. रामचंद्रपंतांचीही योग्यता वाढवून, त्यांच्यासाठीं " हुकुमतपन्हा " असा नवा किताब निर्माण केला; व त्याबद्दल त्यांस विशाळगडीं वस्त्रें पाठवून, ते जे हुकूम करतील ते छत्रपतींनीं मोडूं नयेत, असें केलें.

---

## ७–राजाराम गेल्यानंतरची पन्हाळगडाची स्थिति.

पन्हाळ्याहून निघण्याचे पूर्वीं गड कागलकरांचे स्वाधीन केला होता. मोगलांनीं पन्हाळा व पावनगड या दोहोंसही मोर्चे लाविले. पुनः पुनः कागलकरांनीं रामचंद्रपंतास कुमक पाठविण्याविषयीं लिहिलें. रामचंद्रपंतानें संताजीस सख्त हुकूम पाठविले. पण संताजी या वेळीं सोंडूर प्रांतीं असून, तुंगभद्रेपर्यंत धुमाळी माजविण्यांत व गुत्ती वगैरे किल्ले सर करण्यांत गढून गेला होता. त्यामुळें त्याच्या हातून कुमक करणें होईना. तेव्हां स्वतः मोगलां या पदरीं राहून, बंधु वगैरे मंडळी राजारामाचे पदरीं ठेविण्याची सल्ला रामचंद्रपंतानें कागलकरांस दिली. या प्रमाणें पन्हाळा मोगलांच्या स्वाधीन करून, कागलकरांनीं जवळच्या नातलगांस चंदी प्रांतीं रवाना केलें.

---

## ८–चंदी प्रांतीं पोंचल्यानंतरचा राजारामाचा क्रम.

चंदी प्रतीं आल्यानंतर नवे किताब व नव्या सनदा फडकविण्याचा क्रम राजारामानें चालविला. परसोजी भोसले यास "सेनासाहेबसुभा" असा किताब देऊन गोंडवणाची व वऱ्हाडची सुभेदारी सांगितली. "सर्लष्कर" किताब देऊन गंगातीरची सुभेदारी सिदोजी निंबाळकरास देण्यांत आली. खंडेराव दाभाड्यास गुजराथच्या व बागलाण या सुभेदारीसहित "सेनाधुरंधर" किताब दिला.

ज्यांस हे किताब व सनदा मिळाल्या, त्यांस त्याच क्षणीं जरी सांगण्यासारखा फायदा होत नसे, तरी अधिकार हातीं आल्यामुळें सवडीप्रमाणे आपल्या अमलाच्या चंचुप्रवेशास ते आरंभ करीत. त्यामुळें अविंधांस विसांवा बिलकुल मिळेनासा होऊन, महाराष्ट्र मंडळांत सर्वत्र पुंडाई व पाळेगारी माजूं लागली. ही पुंडाई व पाळेगिरी जे अविंधांच्या बाजूचे मऱ्हाठे असत, त्यांस थोडी मारक होई खरी. पण दुसऱ्या मऱ्हाठ्यांस तिळमात्रही मारक न होतां, उलट भाईबंदी ठेवण्यास अतिशय उपयोगाची होई.

---

## ९—संताजीनें केलेल्या आज्ञातिक्रमाचें फळ.

कागलकरांस कुमक पाठविण्याचें न झाल्यामुळें, रामचंद्रपंताची मर्जी संताजीवरून उडाली. सर्व मजकूर हुजूर कळविल्यानंतर सेनापतीचें पद पानसंबळ यास शालिवाहन शके १६१२ या वर्षीं राजारामानें दिलें होतें. पण पानसंबळ लौकरच चंदी मुक्कामीं वारला, व संताजीनें पश्चात्ताप प्रदर्शित करून असें पुनः न घडण्याविषयीं खबरदारी ठेवण्याचें वचन दिलें. तेव्हां पुनः संताजीस आमच्या मंडळांतील सैनापत्य मिळालें.

---

## १०—चंदीस वेढा पडतो.

राजाराम चंदीमुक्कामीं राहून उपद्रव करूं लागला असें पाहून, दिल्लीपतीनें वेढा घालून चंदी सर करण्याच्या कामीं झुल्फिकाराची योजना केली.

चंदी प्रांतीं येत असतां इस्मायल नांवाचा विजापूरकरांचा एक सर्दार होता त्यानें व अजित नाइरानें मिळून चंदीपासून ६० कोसांवर झुल्फिकारावर छापा घातला. जरी अखेरीस छापा घालणारास हटावें लागलें, तरी झुल्फिकाराची तारंबळ बरीच झाली. झुल्फिकार चंदी मुक्कामीं आल्यानंतर, लौकरच बादशाही कुमकेनिशीं जमलाउल्मुल्कही येऊन पोंचला. तेव्हां कांचीचा फौजदार अलिमर्दान याचे हवालीं तंब करून साठ कोसांवर त्रिचनापल्ली व तंजोर लुटण्यास झुल्फिकार गेला. पुढें इस्मायल वगैरे मुसलमान सर्दार होते ते जरी झुल्फिकारास मिळाले, तरी अजित नाईर वगैरे हिंदु सर्दार होते ते मिळत चालल्यामुळें मऱ्हाठ्यांचा जमाव दिवसें दिवस पोक्त होऊं लागला. बादशहाकडून जो पैसा व दाणा बाहेर पडे, त्याच्यावर वाटेंत मऱ्हाठे तुटून पडत, व त्यामुळें झुल्फिकाराच्या फौजेस बराच त्रास पडून तिचे हालही प्रसंगीं होत. ह्मणून झुल्फिकाराचे हातून कांहीं निष्पन्न होईना. त्यामुळें संतापून अवरंगजेबानें आपला वजीर आसद व मुलगा कामबक्ष यास कुमकेनिशीं झुल्फिकाराच्या डोकीवर पाठविलें.

मऱ्हाठ्यांचे छापे चुकविण्याच्या हेतूनें वरील कुमक आली, ती कांचीपर्यंत चाळीस कोस दाट जंगल लागलें होतें तें तोडून तोडून मार्ग करीत आली. तेव्हां कांचीपर्यंत ४० कोस बादशाही फौजेवर छापा पडला नाहीं, त्यांत नवल नाहीं. पण कांचीहून निघाल्यानंतर मऱ्हाठ्यांनीं आपला पूर्ववत् क्रम चालविला. मऱ्हाठ्यांच्या ज्या ज्या सुट्या टोळ्या बाहेर फिरत होत्या त्यांनीं व चंदींतील वेढा घातलेल्या लोकांनींही बाणांचा वगैरे प्रयोग करून बादशाही लष्करास पुष्कळ त्रास दिला. अखेरीस पावसाळ्यास आरंभ होऊन पाऊसही धों धों पडूं लागला. तेव्हां चंदीपुढें आवेंधांचे हाल थोडे झाले नाहींत.

---

## ११–मऱ्हाठे वेढा उठविण्यास येतात.

पावसाळा संपतांच संताजी व धनाजी या उभयतांस चंदीचा वेढा उठ-

विण्यास १९,००० स्वारांनिशीं रामचंद्रपंतानें पाठविलें. वेढा ठेवून मऱ्हाठ्यांस अडविण्यापुरतें लश्कर जवळ नसल्यामुळें वेढ्यांतल्याच कित्येक पतकांची अडविण्याच्या कामीं योजना करण्यांत आली. ज्या सर्दारांची या कामीं योजना झाली होती, त्यांच्या पैकीं इस्मायल नांवाच्या सर्दारास येण्यास थोडा विलंब लागला. सर्सामान गोळा करीत असतां इस्मायलावर धनाजीनें पोंचतेक्षणींच छापा घातला व गडकऱ्यांनींही आंतून हल्ला चालविला. संध्याकाळपर्यंत लढालढी चालली, तींत इस्मायलचे लोक बरेच पडले. सकाळीं इस्मायल चोरून जात असतां त्यास जखम लागली व मऱ्हाठ्यांनीं पकडलें. पुढें त्याचा जुना मित्र अजित नाईर यानें मध्यें पडून त्यास सोडविलें.

वेढा उठविण्यास येतेक्षणींच बिलकुल विसांवा न खातां हा पहिला पराक्रम करून धनाजीनें एके बाजूकडील वेढ्यास बराच ढिलेपणा आणिला. इतकेंच करून मऱ्हाठे स्वस्थ बसले नाहींत. लश्कराच्या टोळ्या करून, संताजीनें अशी व्यवस्था चालविली कीं बादशाही छावणी व चंदीस वेढा घालणारी फौज या दोहोंस एकमेकांचा पत्ता लागूं नये. अशा प्रसंगीं बादशाहा वारल्याची बातमी मऱ्हाठ्यांनीं पिकाविली. वेढा घालणाऱ्या लश्करास दोन्ही बाजूंनीं उपद्रव होत असतां, बादशहाच्या मरणाची बातमी फैलावत चालली. तेव्हां दिल्लीच्या पदावर लक्ष ठेवून, कामबक्षानें राजारामाशीं तहाचें बोलणें चालविलें. ही बातमी मुद्दाम मऱ्हाठ्यांनीं उठविली, अशी आसुद व झुल्फिकार या उभयतांस शंका आली होती. त्यामुळें राजारामाशीं तहाचें बोलणें नापसंत करून, या उभयतांस विशेष सावधगिरी राखावी लागली. एके रात्रीस आसुद व झुल्फिकार हे दोघे बापलेंक कामबक्ष मऱ्हाठ्यांकडेस जाणार असा बळकट संशय आल्यामुळें हत्यारबंद जागत राहिले.

## १२–खोवरेपाकची लढाई.

चंदी प्रांतीं येत असतां इस्मायल नांवाचा विजापुरकरांचा एक सर्दार होता त्यानें व अजित नाइरानें मिळून चंदीपासून ६० कोसांवर झुल्फिकारावर छापा घातला. जरी अखेरीस छापा घालणारास हटावें लागलें, तरी झुल्फिकाराची तारंबळ बरीच झाली. झुल्फिकार चंदी मुक्कामीं आल्यानंतर, लौकरच बादशाही कुमकेनिशीं जमलाउल्मुकही येऊन पोंचला. तेव्हां कांचीचा फौजदार अलिमर्दान याचे हवालीं तंब करून साठ कोसांवर त्रिचनापल्ली व तंजोर लुटण्यास झुल्फिकार गेला. पुढें इस्मायल वगैरे मुसलमान सर्दार होते ते जरी झुल्फिकारास मिळाले, तरी अजित नाईर वगैरे हिंदु सर्दार होते ते मिळत चालल्यामुळें मऱ्हाठ्यांचा जमाव दिवसें दिवस पोक्त होऊं लागला. बादशहाकडून जो पैसा व दाणा बाहेर पडे, त्याच्यावर वाटेंत मऱ्हाठे तुटून पडत, व त्यामुळें झुल्फिकाराच्या फौजेस बराच त्रास पडून तिचे हालही प्रसंगीं होत. ह्मणून झुल्फिकाराचे हातून कांहीं निष्पन्न होईना. त्यामुळें संतापून अवरंगझेबानें आपला वजीर आसुद व मुलगा कामबक्ष यास कुमकेनिशीं झुल्फिकाराच्या डोकीवर पाठविलें.

मऱ्हाठ्यांचे छापे चुकविण्याच्या हेतूनें वरील कुमक आली, ती कांचीपर्यंत चाळीस कोस दाट जंगल लागलें होतें तें तोडून तोडून मार्ग करीत आली. तेव्हां कांचीपर्यंत ४० कोस बादशाही फौजेवर छापा पडला नाहीं, त्यांत नवल नाहीं. पण कांचीहून निघाल्यानंतर मऱ्हाठ्यांनीं आपला पूर्ववत् क्रम चालविला. मऱ्हाठ्यांच्या ज्या सुट्या टोळ्या बाहेर फिरत होत्या त्यांनीं व चंदींतील वेढा घातलेल्या लोकांनींही बाणांचा वगैरे प्रयोग करून बादशाही लष्करास पुष्कळ त्रास दिला. अखेरीस पावसाळ्यास आरंभ होऊन पाऊसही धों धों पडूं लागला. तेव्हां चंदीपुढें आवेंधांचे हाल थोडे झाले नाहींत.

---

## ११—मऱ्हाठे वेढा उठविण्यास येतात.

पावसाळा संपतांच संताजी व धनाजी या उभयतांस चंदीचा वेढा उठ-

विण्यास १९,००० स्वारांनिशीं रामचंद्रपंतानें पाठविलें. वेढा ठेवून मऱ्हाठ्यांस अडविण्यापुरतें लश्कर जवळ नसल्यामुळें वेढ्यांतल्याच कित्येक पतकांची अडविण्याच्या कामीं योजना करण्यांत आली. ज्या सर्दारांची या कामीं योजना झाली होती, त्यांच्या पैकीं इस्मायल नांवाच्या सर्दारास येण्यास थोडा विलंब लागला. सर्सामान गोळा करीत असतां इस्मायलावर धनाजीनें पोंचतेक्षणींच छापा घातला व गडकऱ्यांनींही आंतून हल्ला चालविला. संध्याःकाळपर्यंत लढालढी चालली, तींत इस्मायलचे लोक बरेच पडले. सकाळीं इस्मायल चोरून जात असतां त्यास जखम लागली व मऱ्हाठ्यांनीं पकडलें. पुढें त्याचा जुना मित्र अजित नाईर यानें मध्यें पडून त्यास सोडविलें.

वेढा उठविण्यास येतेक्षणींच बिलकुल विसांवा न खातां हा पहिला पराक्रम करून धनाजीनें एके बाजूकडील वेढ्यास बराच ढिलेपणा आणिला. इतकेंच करून मऱ्हाठे स्वस्थ बसले नाहींत. लश्कराच्या टोळ्या करून, संताजीनें अशी व्यवस्था चालविली कीं बादशाही छावणी व चंदीस वेढा घालणारी फौज या दोहोंस एकमेकांचा पत्ता लागूं नये. अशा प्रसंगीं बादशाहा वारल्याची बातमी मऱ्हाठ्यांनीं पिकाविली. वेढा घालणाऱ्या लश्करास दोन्ही बाजूंनीं उपद्रव होत असतां, बादशहाच्या मरणाची बातमी फैलावत चालली. तेव्हां दिल्लीच्या पदावर लक्ष ठेवून, कामबक्षानें राजारामाशीं तहाचें बोलणें चालविलें. ही बातमी मुद्दाम मऱ्हाठ्यांनीं उठविली, अशी आसुद व झुल्फिकार या उभयतांस शंका आली होती. त्यामुळें राजारामाशीं तहाचें बोलणें नापसंत करून, या उभयतांस विशेष सावधगिरी राखावी लागली. एके रात्रीस आसुद व झुल्फिकार हे दोघे बापलेंक कामबक्ष मऱ्हाठ्यांकडेस जाणार असा बळकट संशय आल्यामुळें हत्यारबंद जागत राहिले.

## १२–खोबरेपाकची लढाई.

अशा प्रकारें चंदी मुक्कामाच्या बादशाही फौजेंत घरफूट चालली असतां खबर लागली कीं पुढें येऊन थडकलेल्या धनाजीस पाठीमागून कुमक करण्यासाठीं संताजी २०,००० स्वार घेऊन कुचावर कूच करीत संताजी खोवरेपाक मुक्कामीं येऊन ठेपला. खोवरेपाकापासून कांची दहा कोसांवर रहाते. अलिमर्दानानें संताजीची वाट मारण्याचा विचार केला. पण पावसाळ्यांत मस्त माजलेल्या एखाद्या महानदीच्या पुराप्रमाणें संताजी मोगलांवर कोसळला. बादशाही हत्ती, उंट, घोडे व पुष्कळ सामान संताजीस मिळालें; इतकेंच नाहीं, तर कांचीकडे तो पळत असतां अलिमर्दानही हातीं लागला.

## १३–संताजी चंदीचा वेढा उठवितो.

दम न खातां संताजी लगेच चंदीपुढें आला, व बादशाही फौजेंत धान्याचा दुष्काळ पडला. तेव्हां चंदीहून १९ कोसांवर झुल्फिकार धान्य आणण्यासाठीं गेला. जे धान्याचे व्यापारी चंदी मुक्कामीं बादशहाच्या फौजेंत होते, त्यांस तुराणी मोंगलांनीं लुटलें व झुल्फिकाराचा हुकुम कोणी मानीना अशी स्थिति झाली. जें थोडें बहुत धान्य सांपडलें, तें घेऊन झुल्फिकार चंदीकडे वळला. मागें कांहीं मऱ्हाठे टपून राहिले होते, त्यांनीं लागलाच झुल्फिकारावर निकरानें हल्ला केला. या प्रसंगीं दलपत बुंदेल्यानें बादशहाची बाजू बरीच राखली. इतक्यांत रात्र पडली. सकाळीं मऱ्हाठ्यांनीं चाऱ्ही बाजूंनीं हल्ला केला व गोळ्यांचा असा सपाटा चालविला कीं दाण्याचे व्यापारी घाबरले. मऱ्हाठे उमरावांच्या हत्तींचा नेम धरूं लागले, व धान्याच्या खटाऱ्यांचे बैल चिखलांत रुतले. घोड्यांच्या तंगड्यांत जोर राहिला नाहीं व दारूगोळाही संपला, अशी स्थिति झाली. तरी दलपत बुंदेल्यानें शिकस्त केली, ह्मणून थोडें तरीं धान्य झुल्फिकारास आणायास सांपडलें. तरी पुनः दुष्काळ पडला. जे मऱ्हाठ्यांच्या तंबूत जात त्यांस खाण्यापुरतें धान्य मऱ्हाठे वि-

कीत, पण नेऊं देतना. अशा प्रकारें धान्याचा दुष्काळ पडल्यामुळें, तह न केल्यास सोडून जाण्याची धमकी शिपाई व गाडदी यांनीं दिली. दलपत बुंदेल्यानें शिपायांची व गार्द्यांची पुष्कळ विनवणी केली, पण ते ऐकतना. तेव्हां तह करून वेढा सोडून देण्याचें व सगळी फौज विंदवसानीं मुक्कामीं नेण्याचें आसुदानें कबूल केलें. तहाचें बोलणे मऱ्हाठ्यांस पसंत पडलें. नंतर दुसरे दिवशीं दुपारीं १२ वाजतां आसुद लश्करानिशीं निघाला. हत्ती, घोडे, उंटें व दुसरींही मोंगलांकडील जनावरें खाण्यासही पोटभर न मिळाल्यामुळें इतकीं अशक्त व निःसत्त्व होऊन गेलीं कीं त्यांच्यानें सामान मुळींच नेववेना. तेव्हां जरी पुष्कळ सामान जाळलें, तरी बरेंच जमिनीवर पडलें तें सगळें मऱ्हाठ्यांच्या हातीं लागलें. बारा कोसांची मजल मारण्यास बादशाही शिपायांस व जनावरांस चांगले तीन दिवस लागले ! !

## १४–कासिमखानाचा पुरा मोड.

वरील तह बादशहास अर्थातच पसंत पडला नाहीं. तेव्हां त्यानें कामबक्ष व आसुद या उभयतांस परत बोलावून, झुलफिकारासच मऱ्हाठ्यांची मस्ती मोडण्यास सांगितलें. झुलफिकारानें पाहिलें कीं मऱ्हाठ्यांवर हल्ला करून फायदा होण्याची ही वेळ नव्हे. तेव्हां आसपासच्या जमीनदारांवर स्वाऱ्या करून, त्यांच्या पासून झुलफिकारानें बराच पैसा काढिला. व तो बादशहाकडेस धाडला. त्यामुळें पुनः मर्जी बसून बादशहानें झुलफिकारास नांवाजिलें.

विजापुरकरांच्या कर्नाटकांतून संताजीस हांकवून देण्याचा हुकुम बादशहानें वांईचा फौजदार कासिमखान यास फर्माविला व कुमकही धाडली. कासिमानें संताजीस अडविण्याची तयारी चालविली. पण लौकरच उलट संताजीनें अडवून कासिमास दादोरीच्या किल्ल्यांत पिटाळून लाविलें. या किल्ल्यांत दाणा बिलकुल सांठविलेला नव्हता. ह्मणून हत्ती वगैरे जनावरांप्रमाणें शिपाईही भुकेनें मरूं लागले. एक महिना

या प्रमाणें गेला. पुढें जें कांही सरंजाम होतें, तें सगळें संताजीच्या हवालीं करून तह करणें भाग पडलें. कासिमानें आत्महत्या केली व जे उमराव बादशहाकडे गेले त्यांचें तोंड बादशहानें पाहिलें नाहीं. सारांश, संताजीस अडवितां अडवितां, संताजीनेंच बादशहास व बादशहाच्या फौजेस अडवून, दरोबस्त मऱ्हाठ्यांची वीरश्री दीप्त करण्यासाठीं कालपुरुषानें या काळीं पोखरलेल्या आमच्या मंडळाच्या इतिहासरूपी गुहेंत आपलें नांव सोन्याच्या अक्षरांनीं अजरामर कोरून ठेविलें आहे.

## १९–रामचंद्रपंताची संपन्नता.

या सर्व घडामोडी कानडी महाराष्ट्रांत व चंदीस चाललेल्या असतां रामचंद्रपंत मऱ्हाठी महाराष्ट्रांत स्वस्थ बसून मजा मारीत होता, असें नाहीं मऱ्हाठी महाराष्ट्रांतील सर्व प्रकारची व्यवस्था एकट्या रामचंद्रपंतावर पडली होती, कारण छत्रपतीची स्वारी चंदीसारख्या दूरच्या नगरीं असून प्रल्हादपंत प्रतिनिधीही हुजुर राहिलेले होते. इतका मोठा भार आंगावर पडला, तो रामचंद्रपंतानें सहज सोसला; व एकसारखा जागरूकपणा कायम ठेवून आपल्या बुद्धिनेत्रास तिळभरही क्लेश होऊं न देतां, महाराष्ट्र मंडळाच्या सेवेंत व गुणवंत पुरुषांच्या चाललेल्या समाराधनेंत त्यानें आपणाकडून यत्किंचितूही उणें पडूं दिलें नाहीं व शिवसंततीचें एकनिष्ठपणानें काम करून राजारामाच्याही पश्चात् कोणत्याही प्रकारें स्वार्थाकडेस दृष्टि न पोंचवितां उभय लोकीं वहावा मिळविली. याच रत्नपारख्यानें संताजीची पारख पहिल्यानें केली व संताजीस छत्रपतीकडून सेनापतीचीं वस्त्रें देवविलीं. पुढें महाराष्ट्र मंडळाची सेवा एकनिष्ठपणानें करीत नाहीं, अशी शंका आल्यामुळें जरी पहिल्यानें रामचंद्रपंतानें सेनापतीच्या पदावरून संताजीस दूर करण्याची मसलत दिली, तरी आलेली शंका खोटी अशी खात्री होतांच, प्रसंगीं पुनः एकट्या संताजीस सेनापतीचीं वस्त्रें द्यावीं अशी छत्रपतीजवळ शिफारस रामचंद्रपंतानेंच केली. ही रामचंद्रपंताची गुणपक्षपातिता निःसंशय वर्णनीय होय. जसें संताजीस रामचंद्रपंतानें

केवळ त्याच्या गुणांवरून वाढविलें, तसेंच शंकराजी नारायण व परशुराम त्रिंबक या दोन कारकुनांस आपले पदरीं ठेवून त्यांचें सर्वस्वीं कल्याण केलें. शंकराजीनें मोगलांपासून राजगड घेतला व परशुरामपंतानें पन्हाळा प्रांत सर केला. चंदीस वेढा पडलेला असतां, रामचंद्रपंत कांहीं स्वस्थ बसलेला नव्हता. सोलापुर पर्यंत मुलूख लुटून त्यानें मऱ्हाठी महाराष्ट्रांत आपला अंमल पुनः बराच बसविला होता. ५ढें संताजीस व धनाजीस चंदीचा वेढा उठविण्यास पाठविलें. संताजीनेंही अखेरीस चंदीचा वेढा उठवून, रामचंद्रपंताचा भरंवसा अपात्रीं नव्हता, हें उघड करून दाखविलें.

## १६–संताजी व धनाजी.

अशा प्रसंगीं महाराष्ट्रमंडळाचे दुर्दैवानें प्रल्हादपंत चंदी मुक्कामीं वारला. रामचंद्रपंत व प्रल्हादपंत या दोहोंपैकीं एकास लपवून दुसऱ्यास बाहेर काढण्यास इतिहासदृष्ट्या मुळींच अडचण नाहीं. राजारामाचा ओढा पूर्वीपासून धनाजीकडे अधिक होता. तो तसा कां असावा, तें कळत नाहीं. जोंपर्यंत प्रल्हादपंत चंदी मुक्कामीं होते, तोंपर्यंत ते रामचंद्रपंतांप्रमाणें गुणैकपक्षपाती व शुद्ध स्वदेशनिष्ठ रामचंद्रपंताचें सर्व करणें कायम होत असे, व त्यामुळें संताजीचा शब्द लश्करांत वेदवाक्य होऊन प्रल्हादपंतांच्या उलट जाण्याची राजारामाची छाती होईना. संताजी व धनाजी या दोहोंमध्यें मोठा भेद हा होता कीं संताजी लश्करामध्यें सर्व प्रकारें शिवाजीच्या वेळची कैद राखण्यास यत्न करी व लुटीच्या संबंधानें शिवाजीचे सख्त नियम पाळी. धनाजी आपल्या शिपायांस विशेष खुश ठेवण्यास यत्न करी, त्यामुळें जशी संताजीच्या हाताखालच्या पतकांमध्यें कैद असे तशी धनाजीच्या पतकांमध्यें नसे. जे कैदखोर मनुष्य असतात, त्यांच्यामध्यें मनमिळाऊपणा कमी असतो; व ज्यांच्यामध्यें मनमिळाऊपणा फाजिल असतो, त्यांच्यामध्यें कैदेची चहा सांगण्यासारखी नसते. शिवाजीची कैद विलक्षण असे, व गोडबोलेपणावर तसा मितभाषित्वावर अवलंबून जो एका प्रकारचा मनमिळाऊपणा असतो तो शिवाजीमध्यें निःसंशय

या प्रमाणें गेला. पुढें जें कांहीं सरंसामान होतें, तें सगळें संताजीच्या हवालीं करून तह करणें भाग पडलें. कासिमानें आत्महत्या केली व जे उमराव बादशहाकडे गेले त्यांचें तोंड बादशहानें पाहिलें नाहीं. सारांश, संताजीस अडवितां अडवितां, संताजीनेंच बादशहास व बादशहाच्या फौजेस अडवून, दरोबस्त मऱ्हाठ्यांची वीरश्री दीप्त करण्यासाठीं कालपुरुषानें या काळीं पोखरलेलया आमच्या मंडळाच्या इतिहासरूपी गुहेंत आपलें नांव सोन्याच्या अक्षरांनीं अजरामर कोरून ठेविलें आहे.

## १९–रामचंद्रपंताची संपन्नता.

या सर्व वडामोडी कानडी महाराष्ट्रांत व चंदीस चाललेल्या असतां रामचंद्रपंत मऱ्हाठी महाराष्ट्रांत स्वस्थ बसून मजा मारीत होता, असें नाहीं मऱ्हाठी महाराष्ट्रांतील सर्व प्रकारची व्यवस्था एकट्या रामचंद्रपंतावर पडली होती, करण छत्रपतीची स्वारी चंदीसारख्या दूरच्या नगरीं असून प्रल्हादपंत प्रतिनिधीही हुजुर राहिलेले होते. इतका मोठा भार आंगावर पडला, तो रामचंद्रपंतानें सहज सोसला; व एकसारखा जागरूकपणा कायम ठेवून आपल्या बुद्धिनेत्रास तिळभरही क्लेश होऊं न देतां, महाराष्ट्र मंडळाच्या सेवेंत व गुणवंत पुरुषांच्या चाललेल्या समाराधनेंत त्यानें आपणाकडून यत्किंचित्‌ही उणें पडूं दिलें नाहीं व शिवसंततीचें एकनिष्ठपणानें काम करून राजारामाच्याही पश्चात्‌ कोणत्याही प्रकारें स्वार्थाकडेस दृष्टि न पोंचवितां उभय लोकीं वहावा मिळविली. याच रत्नपारख्यानें संताजीची पारख पहिल्यानें केली व संताजीस छत्रपतीकडून सेनापतीचीं वस्त्रें देवविलीं. पुढें महाराष्ट्र मंडळाची सेवा एकनिष्ठपणानें करीत नाहीं, अशी शंका आल्यामुळें जरी पहिल्यानें रामचंद्रपंतानें सेनापतीच्या पदावरून संताजीस दूर करण्याची मसलत दिली, तरी आलेली शंका खोटी अशी खात्री होतांच, प्रसंगीं पुनः एकट्या संताजीस सेनापतीचीं वस्त्रें द्यावीं अशी छत्रपतीजवळ शिफारस रामचंद्रपंतानेंच केली. ही रामचंद्रपंताची गुणपक्षपातिता निःसंशय वर्णनीय होय. जसें संताजीस रामचंद्रपंतानें

केवळ त्याच्या गुणांवरून वाढविलें, तसेंच शंकराजी नारायण व परशुराम त्रिंबक या दोन कारकुनांस आपले पदरीं ठेवून त्यांचें सर्वस्वीं कल्याण केलें. शंकराजीनें मोगलांपासून राजगड घेतला व परशुरामपंतानें पन्हाळा प्रांत सर केला. चंदीस वेढा पडलेला असतां, रामचंद्रपंत कांहीं स्वस्थ बसलेला नव्हता. सोलापुर पर्यंत मुलूख लुटून त्यानें मऱ्हाठी महाराष्ट्रांत आपला अंमल पुनः बराच बसविला होता. पुढें संताजीस व धनाजीस चंदीचा वेढा उठविण्यास पाठविलें. संताजीनेंही अखेरीस चंदीचा वेढा उठवून, रामचंद्रपंताचा भरंवसा अपात्रीं नव्हता, हें उघड करून दाखविलें.

## १६–संताजी व धनाजी.

अशा प्रसंगीं महाराष्ट्रमंडळाचे दुर्दैवानें प्रल्हादपंत चंदी मुक्कामीं वारला. रामचंद्रपंत व प्रल्हादपंत या दोहोंपैकीं एकास लपवून दुसऱ्यास बाहेर काढण्यास इतिहासदृष्ट्या मुळींच अडचण नाहीं. राजारामाचा ओढा पूर्वींपासून धनाजीकडे अधिक होता. तो तसा कां असावा, तें कळत नाहीं. जोंपर्यंत प्रल्हादपंत चंदी मुक्कामीं होते, तोंपर्यंत ते रामचंद्रपंतांप्रमाणें गुणैकपक्षपाती व शुद्ध स्वदेशनिष्ठ रामचंद्रपंताचें सर्व करणें कायम होत असे, व त्यामुळें संताजीचा शब्द लश्करांत वेदवाक्य होऊन प्रल्हादपंतांच्या उलट जाण्याची राजारामाची छाती होईना. संताजी व धनाजी या दोहोंमध्यें मोठा भेद हा होता कीं संताजी लश्करामध्यें सर्व प्रकारें शिवाजीच्या वेळची कैद राखण्यास यत्न करी व लुटीच्या संबंधानें शिवाजीचे सक्त नियम पाळी. धनाजी आपल्या शिपायांस विशेष खुश ठेवण्यास यत्न करी, त्यामुळें जशी संताजीच्या हाताखालच्या पतकांमध्यें कैद असे तशी धनाजीच्या पतकांमध्यें नसे. जे कैदखोर मनुष्य असतात, त्यांच्यामध्यें मनमिळाऊपणा कमी असतो; व ज्यांच्यामध्यें मनमिळाऊपणा फाजिल असतो, त्यांच्यामध्यें कैदेची चहा सांगण्यासारखी नसते. शिवाजीची कैद विलक्षण असे, व गोडबोलेपणावर तसा मितभाषित्वावर अवलंबून जो एका प्रकारचा मनमिळाऊपणा असतो तो शिवाजीमध्यें निःसंशय

होता. पण हे शिवाजीचे दोन गुण सांगड घातलेले क्वचित् आढळतात. रामचंद्र व प्रल्हाद या दुक्कलीमध्यें ते निःसंशय सहवास करीत होते. पण संताजी व धनाजी या दोहोंमध्यें ते दुभागलेले होते. संताजीस मनःमिळाऊपणाचा गांवही माहीत नव्हता व धनाजीमध्यें मनमिळाऊपणा इतका ओतप्रोत व आडवा उभा भरलेला होता कीं शिस्तवारपणास मुळींच रिघाव नव्हता. जोंपर्यंत प्रल्हादपंत हुजुर होते, तोंपर्यंत सर्व सुरळीत चाललें. पण प्रल्हादपंतांचें परलोकीं प्रस्थान होतांच, मंडळास असल्या प्रसंगीं हवा होता तसा वाटाड्या हुजुर मिळाला नाहीं व संताजीची मानहानि राजारामाचे हातून करण्यांत आली. अखेरीस एका दुस्मनानें ओढ्यावर स्नान करीत असतां संताजीवर एका एकीं छापा घातला व त्याचें डोकें कापून तें अवरंगझेबाकडेस धाडिलें ! ! !

## १७–चंदीच्या वेढ्यास दिल्लीपतीकडून कुमक येते.

अवरंगझेबानें तह नापसंत करून, झुल्फिकार पुनः वेढ्याचें काम सांगितलें होतें. संताजीचें व धनाजीचें वांकडें पडलें. ही खबर कळतांच अवरंगझेबानें त्यांच्या बेबनावापासून मोंगलांचा होईल तितका फायदा करून घेण्यास झुल्फिकारास हुकुम पाठविला होता. संताजीच्या खुनाच्या पश्चात् चंदी अगदीं हातीं लागल्याचा भास अवरंगझेबास झाला, व झुल्फिकारास अधिक नेटानें काम चालविण्यास सांगून कुमकही पाठविली.

## १८–रामचंद्रपंताचें प्रसंगावधान व संताजीच्या भाईबंदांचें शहाणपण.

रामचंद्रपंताचें व धनाजीचें घोडें एकत्र पाणी पिणार नाहीं, अशा प्रकारचे मांडे मोगल मनांत खाऊं लागले. पण रामचंद्रपंताचा एक लोकोत्तर गुण हा कीं जी सामग्री मिळेल ती घेऊन यथाशक्ति मंडळाचें काम साधायाचें. असले पुरुष असतात, ते कोणाशींही वैमनस्य ठेवूं इच्छीत नाहींत. संताजी व धनाजी दोघेही क्षत्रिय पडले. संताजी रामचंद्रपं-

ताचा सगा नव्हता व धनाजी शत्रु नव्हता. इतकेंच कीं संताजीस अधिक गुणी व योग्य समजत असल्यामुळें, रामचंद्रपंत जसा त्याच्यावर भार टाकी तसा धनाजीवर टाकीत नसे. पण संताजीचा खून झाल्यानंतर एकट्या धनाजीवर अवलंबून रहाणें रामचंद्रपंतास भाग पडलें. ज्यास देशाचें किंवा मंडळाचें हित कर्तव्य असेल, त्यानें रामचंद्रपंताचाच कित्ता वळविला पाहिजे. "धनाजी मऱ्हाठ्यांमध्यें आतां प्रबळ झाला व राजारामाचा प्रधान रामचंद्रपंत व तो आतां एक झाले" असा बुंदेल्याच्या हकीकतींत लेख आला आहे, त्यावरून वरील मांडे मनांत मोगल खात असून रामचंद्रपंतानें त्यांचें मनोराज्य सिद्ध होऊं दिलें नाहीं, असें ह्मणणें भाग पडतें.

मऱ्हाठ्यांमध्यें संताजीच्या खुनानें जरी दुफळी झाली, तरी मोगलांस तीपासून सांगण्यासारखा फायदा झाला नाहीं; कारण संताजीचा मुलगा व बंधु यांनीं अवरंगझेबाच्या पदरीं राहून देशद्रोहाचें महापातक स्वप्नींही न आणितां, स्वतंत्रपणानें मोगलांची धुळधाणी मऱ्हाठ्यांस कोणत्याही प्रकारें उपद्रव करितां आरंभिली. आमच्या मंडळांतील प्रत्येक जातीनें ध्यानांत ठेवण्यासारखा मऱ्हाठेपणाचा अभिनान घोरपड्यांमध्यें या काळीं होता.

## १९–रामचंद्रपंताची मसलत व चंदींतून राजारामाची सुटका.

रामचंद्रपंतानें राजारामास या वेळीं अशी सल्ला दिली कीं आतां सातारा किंवा विशाळगड राजधानी करावी. प्रल्हादपंत वारले व संताजीचा खून झाला, हीं दोन चिन्हें रामचंद्रपंतांस चांगलीं दिसलीं नाहींत. जर चंदी पडली व राजाराम पकडला गेला, तर मऱ्हाठ्यांचें नाक कापलें जायाचें. सातारा व विशाळगड हीं ठिकाणें तर मऱ्हाठी महाराष्ट्रांत पडलीं. जशी चंदीसारख्या दूरच्या ठिकाणीं कुमक पाठविण्यास प्रसंगीं अडचण पडते, तशी वरील दोन ठिकाणीं पडण्याचा संभव नाहीं. इतकेंच नाहीं, तर कुमक पोंचविण्याचे कामीं जी जी प्रसंगीं

कार्यकारिता संताजीमध्यें होती, तिचा गंधही धनाजीमध्यें नव्हता. असा पोक्त विचार करून चंदी सोडण्याची मसलत छत्रपतीस देऊन, रामचंद्रपंतांनीं हें बरेंच जोखिमाचें काम खंडो बल्लाळावर सोंपविलें.

किल्ल्याचे नैर्ऋत्येस गणोजी शिर्के व राणोजी शिर्के यांचें मोर्चे होते. जो शिर्का सांपडेल त्यास ठार अरावा, असा हुकुम राज्यांतून संभाजीनें फर्माविला, तेव्हां नाइलाज होऊन हे उभयतां बंधु मोगलांचे पदरीं राहिले, या बंधूंस भेटून फोडण्याचा विचार खंडो बल्लाळानें केला.

खंडो बल्लाळाची व शिर्क्यांची भेट झाली, तेव्हां शिर्के ह्मणाले "जसें आमचें शिरकाण केलें, तसा भोंसले याचा निर्वंश झाल्यास चिंता नाहीं." हें ऐकून चिटणीसांनी जें उत्तर दिलें, तें प्रत्येक जातीच्या मऱ्हाठ्यानें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. चिटणीस ह्मणाले कीं "या समयास तुह्मीं बोलतां हें योग्य नव्हे. तुमचें शिरकाण केलें, तसेच आमचे तीन पुरुष हत्तीचे पायांखालीं मेले, परंतु हिंदूंच्या दौलती करितां आह्मीं झटतच आहों, आणि तुह्मीं तों आप्त शरीख आहां. या समयास महाराज व कबिले काढून द्यावे. तुमचे भाच्याचेंच राज्य. या समयीं राजारामसाहेब यांस कुटुंबसुद्धां एक करून दिल्यास तुमची कीर्ति होईल." या चिटणिसांच्या पोक्त बोलण्यानें शिर्क्यांचें हृदय बरेंच द्रवलें, व मऱ्हाठेशाहीचा या काळीं मुख्य पुरुष व आपलाच आप्त यास यथाशक्ति मदत करण्याकडेस त्यांच्या चित्तानें ओढ घेतली. शिर्क्यांचें वंशपरंपरागत दाभोळचें वतन चिटणीसांस मिळालेलें होतें, त्याची मात्र सनद पुनः आपणांस मिळावी, असा उभयतां बंधूंनीं उद्गार काढिला. तेव्हां चिटणीस ह्मणाले कीं "स्वामिकार्याहून वतन व जीवित्व कांहीं आह्मांस अधिक नाहीं; सर्व अर्थ आमचे स्वामीचे पाय आहेत." पुनः शिर्के ह्मणाले कीं "मोहितेही आप्त. या राजकारणांत त्यांस घेतलें पाहिजे. त्यांस रत्नागिरी तालुक्यांत कुटरी गांव आहे, तो इनाम करून द्यावा. आह्मांस भोर तालुक्यांत तीन गांव व रत्नागिरी तालुक्यांत पांच गांव इनाम करून द्यावे."

हें सर्व कबूल करून शिर्के व मोहिते यांस इष्ट "गांवाच्या व दाभोळ येथील देशमुखीच्या सनदा" चिटाणिसांनीं नेऊन पोंचाविल्या.

पुढें शिर्के व मोहिते या उभयतांनीं आपल्या आप्तांच्या बायका असें पिकवून राजारामास मुत्सदी मंडळीसुद्धां आपल्या गोटांत आणिलें. दुसरे दिवशीं शिर्के व मोहिते शिकारीच्या निमित्तानें बाहेर पडले; व कांहीं कोसांवर धनाजीची फौज होती तिच्यामध्यें राजारामास व मुत्सदी मंडळीस सुरक्षित पोंचविते झाले.

पुढें १६१८ धातानाम संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदेचे दिवशीं नेटानें हल्ला करून चंदीचा किल्ला घेतला, तेव्हां चौकशी अंतीं झुल्फिकारास राजाराम पूर्वींच पळून गेलेला आढळला.

## २०–राजारामाचा शेवट.

सुटून आल्यानंतर रामचंद्रपंताच्या मसलतीप्रमाणें राजारामानें सातारा आपली राजधानी केली; व रामचंद्रपंतास त्याचें पूर्वींचें अमात्यपद देऊन, त्याचा कारकून शंकराजी नारायण यास सचिवपद दिलें.

कांहीं महिन्यांनीं राजारामानें वऱ्हाडांत स्वारी करण्याची तयारी केली. पर्सोजी भोसले, हैबतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे वगैरे मंडळी राजारामास मार्गांत मिळाली. पुढें गंगथडी वगैरे मुलुखांतून चौथ व सर्देशमुखी घेऊन येतांना, राहिलेली बाकी उग्राणी करण्यास खानदेशांत नेमाजीची, वऱ्हाडांत परसोजीची, गंगथडींत हैबतरावाची, अशी योजना राजारामानें केली. पुढें जालना पेंठ लुटून फन्ना करून परत येत असतां, राजारामावर अवरंगझेबाचा नातू बेदरबख्त व झुल्फिकार या दोहोंनीं हल्ला केला. उभयतांसही न जुमानतां लूट आपल्या मुलखीं राजारामानें सुरक्षित आणिली. पण मोगलांच्या पाठलागापासून झालेल्या हालांमुळें "राजारामाची प्रकृति लौकरच बिघडली. अखेरीस नवज्वर होऊन सिंहगडीं शके १६२१ फाल्गुन वद्य अष्टमी या दिवशीं राजारामानें राम-

चंद्रपंताचे स्वाधीन सर्वांस केलें" व लागलेंच महाप्रस्थान ठेविलें.

## उपसंहार.

### १–राजारामाच्या पश्चात् मऱ्हाठेशाहीची स्थिति.

प्रल्हाद निराजी वारला, संताजीचा खून झाला व छत्रपतीनेंही प्रयाण केलें. राजारामाचा मुलगा शिवाजी हा शा० शके १६१२ प्रजापति नाम संवत्सरे या वर्षी जन्मला होता. तेव्हां राजाराम वारला, तेव्हां शिवाजीचें वय ८ वर्षांहून अधिक नव्हतें. तेव्हां जरी शिवाजीस गादी मिळाली, तरी कारभार ताराबाई पाहूं लागली. ताराबाई जरी जातीनें बायको होती, तरी पुरुषाचे मर्दानी गुण तिच्या आंगीं पूर्णपणें वसत होते व रामचंद्रपंताची योग्यता ती नीट जाणून होती. तशांत रामचंद्रपंताच्या मसलतीबाहेर गुंजभरही पाऊल टाकण्याचें स्वप्न धनाजीस या काळीं पडलें नाहीं. तेव्हां जरी छत्रपतीच्या मरणानें बरीच तारंबळ झाली, तरी अखेरीस महाराष्ट्रमंडळाचें स्वातंत्र्य कायम राहिलें.

### २–साताऱ्याचा वेढा.

राजारामाचे मरणाचे पूर्वींच दिल्लीपतीनें खुद्द आपल्या नजरेखालीं लढाई चालवून थोडक्याच वेळांत मऱ्हाठ्यांस रसातळीं नेण्याचा घाट घातला व त्याप्रमाणें तीन दिवसांत वसंतगड घेऊन, साताऱ्यास वेढा दिला.

साताऱ्याच्या उत्तरेस एक कोसावर कारंजें आहे, तेथें खांसा दिल्लीपति तळ देऊन राहिला. बादशहाचा दुसरा मुलगा अझीमशहा हा पश्चिमेकडेस परळीच्या रस्त्यावर राहिला. साताऱ्याच्या दक्षिणेस सेंदऱ्यानजीक सर्जेखानास जागा मिळाली. या प्रसंगीं चांभारटेंकडीच्या खालीं डोंगर फोडून सर्जेखानानें खिंड पाडली, तीस "सर्जा खिंड" ह्मणूं लागले. पूर्वेस तर्बियतखान गारदी याचा पहारा बसला होता. परळीचा किल्लेदार या वेळीं परशुराम त्रिंबक होता, व सातारचा किल्लेदार प्रयागजी परबु होता.

कित्येक चोरवाटा परशुरामपंतास माहीत होत्या, त्यांनीं हवी तेव्हां सामग्री साताऱ्याच्या किल्ल्यांत सहज पोंचवितां येई. ही खबर लागल्या-मुळें दिल्लीपतीनें सभोंवतीं खंदक खणविला व रसद बंद करून टाकली. मोगलांनीं बरेच वेळां हल्ला केला. पण प्रयागजीनें गडकऱ्यांजवळून मोठे मोठे दगड अशा रीतीनें खालीं टाकविले कीं तोफेच्या गोळ्यांपेक्षांही अ-धिक आकांत त्या दगडांनीं केला. तेव्हां ईशान्य कोनास मंगळाईच्या बुरुजाखालीं सुरुंग उडवून वाट करण्याचा विचार बादशहानें केला व त्या कामावर तर्वयताची योजना झाली. माती खणून काढण्यास दीड लाख रुपयांवर खर्च झाला, असें खाफीखान ह्मणतो. सुरुंग उडविला ही किल्ल्यावरील लोकांस "बातमी न समजावी, असा बेत राखून, बुरुजाखा-लीं दारूचे बुधले पुरून, मोर्चे हुशार राखून, आपण खांसा तक्तरांव्यावर बसून स्वारी बाहेर आली. त्या समयीं बत्ती देवविली. लोक पादशहा-चीं स्वारी पहाण्यास मंगळाईचे बुरुजावर उत्तरेकडील तटावर उभे राहिले. त्या समयीं मंगळाईचे बुरुजाची सोंड शें दोनशें हात वरती उडोन जेथील तेथें कायम झाली. त्या काळीं वरील लोक शें दोनशें तटाखालीं पडून मेले. खालील लोक मोर्चे बंदीचे बहुत मेले व जांया झाले." बुंदे-ल्याच्या हकीकतींत "चारशें किल्ल्यावरील माणूस उडाले; पण तर्बियतानें बंदोबस्तानें रहाण्यास न सांगितल्यामुळें लहान मोठ्या उमरावांसुद्धां तीन हजार लोकांचा नाश झाला" असा लेख आला आहे. "कड्याचे दगड फुटोन तोफेच्या गोळ्याप्रमाणें लश्करांत पडोन, कांहीं जायां झाले व मेले. बुरुज उडाला, ते समयीं धुरळ्याची गर्दी होऊन घटकाभर धुंदी झाली. धुंद निवळल्यानंतर किल्ल्यावरचे लोक हुशार होऊन, नगारे, कर्णे, तुतारे वाजवून तोफा सुरू केल्या. जागांजागां लोक उभे राहून तटावरून धोंडे लोटले. सुरुंग उडाला, ते समयीं प्रयागजी प्रभु सुभेदार बुरुजा नजीक झाडाखालीं बसले होते, तेथें दगड येऊन पडले. त्यांचें आयुष्य बलोत्तर!!! तीन धोंडे तिहींकडे, मोठा धोंडा वर्ता एक, अ

घराप्रमाणें झालें; आणि वर मातीचा ढीग पडला. तेव्हां घरांत खोलींत असावें असा भास त्यांस होऊन ईश्वरांनीं बचाव केला. ते समयीं लोकांनीं चोहोंकडे पहातां हरळी जाहाली, जे सुभेदार दिसत नाहींत. ते पहातां मातीचा ढीग बुरुजाप्रमाणें पडलेला. उकरून पहातात तों झग्याचा पदर दृष्टीस पडला. त्याजवरून येथें आहेत असें ओळखून माती काढूं लागले. तों दगडाच्या आंतून बोलिले कीं मी जिवंत आहें. असें ह्मटल्यावर लोकांनीं माती दगड युक्तीनें काढून आंतून बाहेर काढिले. ते खेर होऊन निघाले. पुनर्जन्म झाला ह्मणून लोकांस हुशारी येऊन नगारे आदि वाद्यें केलीं. पुन्हा तोफा सुरु कर्ते झाले." अशी वेढ्याची स्थिति झालेली पाहून, बादशहास अत्यंत वाईट वाटलें, त्यांत नवल नाहीं. पुढें परळीच्या किल्ल्यावरून अझीमशहाच्या मार्फत परशुरामपंतांनीं बादशहाकडेस बोलणें लाविलें कीं सातारच्या किल्लेदारानें "सर्व लोकांचा बचाव करून चीज, वस्त, हत्यारसुद्धां घेऊन उतरावें." हें बोलणें कबूल झाल्यानंतर, सातारचा रिकामा किल्ला बादशहाचे स्वाधीन करून मऱ्हाठे परळीकडे निघून गेले.

## ३—परळीचा वेढा.

सातारा पडल्यानंतर मोगलांचे मोर्चे परळीस लागले, व फत्तेउल्लाखानास वेढ्याचें काम दिल्लीपतीनें सांगितलें. संधि पाहून फत्तेउल्लाखानानें शिड्या लाविल्या व हल्ला केला. पण या एका हल्ल्यांत ३०० मोगल मेले, असें बुंदेले ह्मणतो. परशुरामपंतांनीं ६ महिने किल्ला लढविला. पावसाळा सुरू होऊन पावसाची मुसळधार कोसळूं लागली, व त्यामुळें आकाश जसें काय फाटलें अशी शंका येऊं लागली. शाहू या प्रसंगीं बादशाही तंबूंत होता. एकदा बादशाही छावणी इतकी पावसानें भिजून चिंब झाली कीं शाहूचा हुजऱ्या जोत्याजी केसरकर यानें तेलांत कांकडे भिजवून शाहूस भात करून घातला. अशा समयीं साताऱ्याप्रमाणें परळीचा रिकामा किल्ला हवालीं करून, परशुरामपंतांनीं आपल्या लोकांनिशीं

वासोट्याची दिशा धरलि.

## ४–पन्हाळ्याचा वेढा.

याप्रमाणें सातारा व परळी हे दोन किल्ले अवरंगझेबाच्या हातीं लागले. परळी पडल्यानंतर दुसऱ्या एखाद्या गडास मोगलांचा वेढा पडला. पण पावसाळ्यानें पावसाचा मुसळधार मारा सुरू केल्यामुळें, बादशहानें छावणी खवासपुरास नेली. तरी छावणीचा काहीं भाग ह्मणून वाहून गेलाच. उजव्या पायास व्रण झाल्यामुळें, बादशहा बिछान्यावर तळमळत पडला आहे, अशा समयीं नदीस पूर आला. पाणी बादशहाच्या खोलींत शिरून आकांत करून सोडणार, अशी धास्ती पडली. पण बादशहाच्या “ आयुष्यतैला ”स अजून ‘ अंत ’ झाला नव्हता, त्यामुळें पाण्याचा जोर लौकरच कमी झाला. बादशहास तर चैन पडेना. पन्हाळ्यास वेढा घालण्यास बेदरबख्तास हुकुम झाला, व झुल्फिकारास बेदरबख्ताबरोबर निघण्याचा फिर्मान आला. मिरज मुक्कामीं बेदरबख्ताची व झुल्फिकाराची गांठ पडली. पण बरेच दिवस नदीस पूर येत होता, तो थांबेना. ह्मणून दोघांच्यानेंही पुढें जाववलें नाहीं. पण बादशहाकडून हुकुमावर हुकुम येऊं लागले. तेव्हां नाइलाज होऊन दोघेही पुढें चालले. वाटेंत हाल पुष्कळ झाले, तरी शेवटीं वेढा ह्मणून पन्हाळ्यास पडला. प्रसंगीं कुमक पाठविण्यास व आपल्या डोळ्याखालीं सर्व काम चालावें ह्मणून अवरंगझेब खवासपुराहून मिरजेस आला. रामचंद्रपंतानें वेढा उठविण्यासाठीं धनाजीस पाठविलें. मोठी धिट्टाई करून, धनाजीनें बादशाही छावणीच्या पंचक्रोशींतील मुलुख लुटला, व दाण्याचे व्यापारी बादशाही छावणीकडेस वळतांना वाटेवर पाहिले त्या सर्वांस चौफेर घेतलें. ही बातमी ऐकतांच बेदरबख्तानें पहिल्यानें सर्दारखानास पाठविलें. पण तो नामोहारोम होतो किंवा झाला, अशी बातमी लागल्यामुळें झुल्फिकार, दलपत बुंदेले व रामसिंग हर्रा या तिघींस रवाना करण्यांत आलें. तेव्हां मिळालेली लूट

गोळा करून, अधिक लुटीची आशा न करितां मऱ्हाठ्यांनीं रात्रौ हळूच पाय काढून घेतला. सारी रात्र झुल्फिकार वगैरे मंडळी हत्यारबंद जागली व सकाळीं पहाते तों मऱ्हाठ्यांचा पत्ता नाहीं!!! पुढें लौकरच सातारा व परळी या दोन किल्ल्यांप्रमाणें पन्हाळगडही अवरंगझेबाचे हातीं लागला.

## ५–विशाळगडचा व सिंहगडचा वेढा.

नंतर चंदनवंदनास वेढा घालण्याचें काम बहिरामखानास सांगून, खांसा दिल्लीपतीनें विशाळगडास वेढा घातला. विशाळगडास वेढा पडला असतां, एके दिवशीं बादशाही छावणीच्या सर्व वाटा मऱ्हाठ्यांनीं धरल्या व धान्य सर्व मारून नेलें. त्यामुळें बादशाही छावणींत दुष्काळानें आपलें स्वरूप प्रकट केलें. पुढें पूर्वींच्या इतर गडांप्रमाणें विशाळगडही हातीं लागला.

पुढें भरपावसाळ्यांत बादशहाची स्वारी तुळापुरीं निघाली. या प्रसंगीं खाशाचे तंबूदेखील पाठीं राहूं लागले, व हत्ती, उंटें, बैल वगैरे कैक जनावरें थकल्यामुळें पाठीं सोडून द्यावीं लागलीं. जो माल अशा रीतीनें पाठीं राहे, त्याचे मालक मऱ्हाठे होत. लौकरच मऱ्हाठे अहमदनगर लुटूं लागले व इतके माजले कीं बादशाही छावणीपासून दोन कोसांवर हत्ती चरत होते ते त्यांनीं पकडून नेले. ते परत आणण्यासाठीं बादशहानें महमद अमीनास पाठविलें. पण महंमद अमीनाची सोळा आणे फजिती होऊन, हत्ती, घोडे, उंट वगैरे दरोबस्त बादशाही सरंजाम मऱ्हाठ्यांच्या हातीं लागलें व चोराप्रमाणें एका गांवढ्यांत महंमदास लपून रहाणें भाग पडलें. या गांवढ्यांतून चांभारगोंद्यास नंतर महंमद अमीनाची तिकडील फौजदारानें बादशाही छावणींत रवानगी केली!!! सारांश, बादशहाचा खुद्द 'सदर–उल्–सदूर' यास मऱ्हाठ्यांनीं असे दिवस दाखविले.

लौकरच बादशहा सिंहगडास वेढा देण्यास गेला, व फत्तेउल्लाखानास विशाळगडाहून तोफा आणण्यास हुकुम झाला. सिंहगडास वेढा पडलेला असतां, कामबक्षानें बापास एकदा अशी मसलत दिली कीं शाहूस अंकित करून सोडावें व जर बादशहाची ताबेदारी मऱ्हाठे करतील तर दक्षिणची सुभेदारीही द्यावी. कांहीं दिवसांनीं बादशहाचा काळ होणार व नंतर जो तख्तासाठीं तंटा लागणार त्यांत मऱ्हाठे आपल्या बाजूस असल्यास सहज कार्यसिद्धि होईल, अशा मतलबानें कामबक्षानें ही मसलत बादशहास सादर केली. ही मसलत पसंत पडून, बादशहानें शाहूस कामबक्षाच्या हवालीं केलें, त्याचा मतलब निराळा होता. मऱ्हाठ्यांमध्यें दुफळी होती, ह्मणजे सुभेदार शाहूचा पक्ष घेऊन दुसऱ्या पक्षास बुडविणें दिल्लीपतीस शक्य होतें; व शाहूची सुभेदारी कायम झाल्यानें मोगलांचें राज्य दक्षिण देशेस एकछत्री झालें असतें. पण या काळीं "ताबेदारी" शब्द मऱ्हाठ्यांस नको होता. जसा अविंधांचा बादशहा, तसा आपला छत्रपति मऱ्हाठे समजत. शिवाजीनें अभिषेकापासून मऱ्हाठ्यांची स्वतंत्र पादशहात स्थापन केली होती. शिवाजीचा पट्टशिष्य रामचंद्रपंत व कर्ती सून ताराबाई या उभयतांस "ताबेदारी" शब्द किळस आणणारा होता, त्यांत नवल नाहीं. परशुरामपंत वगैरे मंडळी होती, तसिही रामचंद्रपंताचें शिष्यत्व मिळालें होतें. तेव्हां ताबेदारीच्या संबंधानें या वेळीं मऱ्हाठ्यांमध्यें द्वैत असण्याचा संभव बिलकुल नव्हता. त्यामुळें कामबक्षाची मसलत वायां जाऊन शाहूस परत बादशहाकडेस पाठवावें लागलें. पुढें लौकरच सिंहगडही पडला.



## ६–दुसरेही मऱ्हाठी महाराष्ट्रांतील गड पडतात व अवरंगझेब कानडी महाराष्ट्राकडेस वळतो.

सिंहगड पडल्यानंतर बादशहा कांहीं दिवस पुणें मुक्कामीं राहिला. मऱ्हाठे आसपासचा मुलुख लुटीत गेल्यामुळें, पुण्यास या वेळीं धारण रुपयाची ३ शेर झाली. लौकरच बादशहानें राजगडास वेढा दिला.

राजगड पडला व पुढें लोहगडही पडला. याप्रमाणें बराच मुलुख बादशहाच्या हस्तगत झाला. पण जो मुलुख हस्तगत झाला, तो मऱ्हाठ्यांनीं उद्वस्त व ओसाड करून टाकलेला होता. धान्य वगैरे सर्व सामग्री बादशहास हिंदुस्थानांतून आणावी लागे. जी सामग्री येई, तिच्यावर एक ठिकाणीं सोडून दहा ठिकाणीं मऱ्हाठे छापा घालीत. त्यामुळें पुष्कळ लुटली जाऊन, थोडीबहुत उरे, तितकी मात्र बादशहाचे पदरीं पडे. या वर्षी दोन मोठीं लंबाणें हिंदुस्थानांतून येत होतीं, त्यांच्यावर मऱ्हाठ्यांनीं फर्दापुराजवळ घाला घातला. तेव्हां अन्नही पोटभर मिळेना, अशी बादशाही लश्कराची स्थिति झाली. हमेश लूट करीत ह्मणून मऱ्हाठे श्रीमंत झाले व जोरावले, अशा अभिप्रायाचा लेख बुंदेल्याच्या हकीकतींत आला आहे.

इतक्यांत वांकणखेड्याचा नाईक पुनाप्पा बळावला होता, त्यास शासन करण्यासाठीं अवरंगझेब कानडी महाराष्ट्राकडेस वळला. तुळापुराजवळ बादशाही सामान पडलें होतें तें मऱ्हाठ्यांनीं छापा घालून लुटलें व जें नेणें झालें नाहीं तें जाळून खाक केलें.

## ७–रामचंद्रपंताची कर्तबगारी व चलाखी.

अवरंगझेबानें कानडी महाराष्ट्राकडेस पाऊल टाकलें, ही खबर लागतांच, रामचंद्रपंतानें पन्हाळा, पावनगड वगैरे किल्ले माळा लावून घेतले. अण्णाजी नांवाच्या ब्राह्मणाच्या मार्फत परशुरामपंतानेंही सातारा, परळी वगैरे किल्ले काबीज केले. साताऱ्याचा किल्ला परशुरामपंतानें घेतला, तो विलक्षण रीतीनें घेतला. गोंसाव्याचा वेष धारण करून, पहिल्यानें अण्णाजी आंत शिरला, व " उत्तरेचे तटास रेडका बुरुज " आहे, तेथें पर्णशाळा बांधून राहिला. पुढें " भेद करून, परशुरामपंतास संकेत करवून, बातमी राखून लोक आणवून, माळ लावून किल्ला पुनः घेतला " लोहगड, सिंहगड वगैरे किल्लेही मऱ्हाठ्यांनीं याप्रमाणें पुनः लौकरच काबीज केले.